दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे
बीड/महाराष्ट्र शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी २०२५ आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ वर्ष २ रे अंक-११७ पाने ४ किंमत ४ रुपये

## उद्धव साहेबांना हिऱ्यासारखे लोक सांभाळता आले नाही

**जालना**–उद्धव ठाकरे यांचे एकनिष्ठ म्हणून ओळखले जाणारे राजन साळवी यांनी आज शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यावरून शिंदे गटाचे नेते व जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर यांनी मोठे विधान केले आहे. उद्धव साहेबांना हिऱ्यासारखे आपले लोक होते ते सांभाळता आले नाही, हे दुर्दैव आहे, असे अर्जुन खोतकर म्हणाले आहेत.
राजन साळवी यांचा पक्षप्रवेशावर अर्जुन खोतकर म्हणाले, उद्धव साहेबांना सोडून जाण्याचा प्रश्न नाही. त्यांनी विचारधारा बदलली आहे. शिवसेनाप्रमुखांचे आम्ही शिवसैनिक आहोत. शिवसेनाप्रमुख गेल्यानंतर हीच कमान उद्धव ठाकरे यांच्या हातात आली होती. परंतु उद्धव साहेबांना हे जे हिऱ्यासारखे आपले लोक होते ते सांभाळता आले नाही, हे दुर्दैव आहे. उद्धव ठाकरे यांना सोडून जाताना एकनाथ शिंदे असतील किंवा मी असेल आम्हाला दुःख झालेच आहे. आम्ही काय आनंदाने थोडी गेलो होतो किंवा शिंदे साहेब थोडी आनंदाने गेले.पुढे बोलताना अर्जुन खोतकर म्हणाले, शिवसेनेत एक चांगली गोष्ट घडली आहे.

# ‘लाडक्या बहिणीं’ चे पैसे कसे बंद करतात तेच पाहतो:जयंत पाटलांचा महायुती सरकारला इशारा

## आतापर्यंत ५ लाख लाभार्थ्यांची नावे वगळली;फेब्रुवारीचा हप्ता केव्हा मिळणार?

**मुंबई (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींची छाननी सुरू केली असून निकषात न बसणाऱ्या महिलांना अपात्र ठरवले जाणार आहे. आतापर्यंत पाच लाख लाभार्थींना अपात्र ठरवत त्यांचा लाभ बंद करण्यात आला आहे. यावरून विरोधकांनी महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे देखील आक्रमक झाले आहेत. त्यांनी सरकारला इशारा देत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद होणार, यासाठी आम्ही पक्ष संघटनेच्या माध्यमातून तालुका–तालुका पातळीवर लढाई उभारणार असल्याचेही सांगितले.महायुती सरकारने गतवर्षी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांची अर्थसाहाय्य केले जात आहे. त्याचा महायुतीला निवडणुकीत मोठा फायदा झाला. पण आता सरकारने या योजनेतील लाभार्थ्यांची पडताळणी सुरू केली आहे. त्यात अनेक महिलांनी खोटी माहिती देऊन या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर येत आहे. विशेषतः इतर सरकारी योजनांतील लाभार्थ्यांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सरकार या प्रकरणी काटेकोट पडताळणीवर भर देत आहे. आतापर्यंत या योजनेतून सुमारे ५ लाख लाभार्थींना वगळण्यात आले आहे.**

आता आम्ही लाडक्या बहिणीची बाजू घेऊन काम करणार आहोत, असे जयंत पाटील म्हणाले. लाडक्या बहिणीचे पैसे बंद होणार नाहीत, यासाठी आमचा लढा राहणार असल्याचेही ते म्हणाले. लाडक्या बहिणींनो आम्ही तुमच्या मागे आहोत, असा विश्वासही त्यांनी दिला.लाडक्या बहिणींनी तुम्हाला मते दिली आहेत, त्यांना तुम्ही शब्द दिला आहे, त्यामुळे एकदा दिले तर दिले, त्यांनी मते दिली आहेत, त्यामुळे बघून द्यायचे होते, आम्ही घाई करा म्हणत होतो का? असा खोचक टोला जयंत पाटील यांनी महायुती सरकारला लगावला आहे. लाडकी बहिणींसाठी पैसे बंद होणार नाही, यासाठी आम्ही पक्ष संघटनेच्या माध्यमातून तालुका–तालुका पातळीवर लढाई उभारणार असल्याचेही त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून सुमारे ५ लाख लाभार्थ्यांना वगळण्यात आले आहे. यामध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असणाऱ्या २ लाख ३० हजार महिलांना या योजनेतून वगळण्यात आले आहे. तसेच वय



वर्षे ६५ हून अधिक असणाऱ्या १ लाख १० हजार महिलांची नावेही या योजनेतून हटवण्यात आली आहेत. कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमो शक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या, स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या १ लाख ६० हजार महिलांची नावेही लाडकी बहीण योजनेतून कमी करण्यात आली आहे. त्यामुळे एकूण ५ लाख महिला लाभार्थ्यांची नावे या योजनेतून वगळण्यात आली आहेत.दुसरीकडे, या योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता केव्हा मिळेल याविषयी महिला वर्गात चर्चा सुरू झाली आहे. जानेवारीचा हप्ता महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यानंतर मिळाला होता. त्यामुळे या महिन्यातही त्याच कालावधीत लाभ मिळण्याची शक्यता आहे. विशेषतः महायुती सरकारने निवडणुकीच्या प्रचारात या योजनेतील अर्थसहाय्याची रक्कम १५०० वरून २१०० करण्याची ग्वाही दिली होती. आता राज्याच्या अर्थसंकल्पात तशी एखादी तरतूद केली जाते काय? असा सवालही या प्रकरणी चर्चिला जात आहे.

## अंबाजोगाई बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी व पर्स चोरी

**अंबाजोगाई | परवेज पटेल**

अंबाजोगाई शहरातील बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत प्रवाशांचे दागिने व रोख रक्कम चोरीच्या घटना समोर आल्या आहेत.
प्राप्त माहितीनुसार, दिनदयाळ कॉलनी येथील रहिवासी व खोलेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापक सतिष सुरेशराव हिवरेकर यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे मेव्हणे श्री. राजेंद्र मधुकरराव पानसरे (रा. फरांदेनगर, नांदेड) हे अंबाजोगाई येथे आले होते. त्यांना लातूरला जाण्यासाठी बसस्थानकावर सोडण्यासाठी प्राध्यापक हिवरेकर व त्यांचा चुलत भाऊ निलेश हिवरेकर दुपारी ४ वाजता बसस्थानकात गेले.मेव्हणे बसमध्ये चढत असताना गर्दीचा



फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील अंदाजे १७–१८ ग्रॅम वजनाची सोनसाखळी चोरी केली. घटनेनंतर बसमध्ये तसेच परिसरात चोराचा शोध घेतला असता कोणताही संशयित आढळून आला नाही
याच दरम्यान, सय्यद आलिमा अकबर (रा. धानोरा खुर्द) या युवतीची देखील पर्स चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आला. अंबाजोगाई–आपेगाव बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या पर्सची चोरी केली. सदर पर्समध्ये १,००० रुपये रोख, बस पास, एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड व पोस्ट डेबिट कार्ड होतेया दोन्ही घटनेची तक्रार प्राध्यापक सतिष हिवरेकर व सय्यद आलिमा अकबर यांनी पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. गर्दीचा फायदा घेत बसस्थानक परिसरात चोरीच्या घटना वाढत असल्याने प्रवाशांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत

## विहामांडवा येथे श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालय मंजूर करा–आ.विलास भुमरे

**विहामांडवा | प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील विहामांडवा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असून वाढती लोकसंख्या, आसपासच्या ३८ खेड्यांच्या रुग्णांचा वाढता भार लक्षात घेता येथे सर्वसोयीयुक्त असे श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालय असणे गरजेचे आहे. अशी वारंवार होत असलेली ग्रामपंचायतची मागणी लक्षात घेता आ. विलास भुमरे यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे विहामांडवा येथे श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालय मंजूर करा, अशी मागणी केली आहे. विहामांडवा हे पैठण तालुक्यातील मोठी बाजारपेठेचे
गाव असून येथे ३८ खेड्यांशी जोडलेले




आहे. साखर कारखाना, शेंगदाणा मिल, दुय्यम बाजारपेठ अशा मोठ्या उद्योगासह सुमारे तीनशे छोट्या–मोठ्या आस्थापना येथे कार्यरत आहेत. परिणामी, येथे वाढत्या मजुरांमुळे गावाची लोकसंख्या सुमारे २९ हजारांच्या आसपास पोहोचली आहे. परिणामी, रुग्णसंखेतही वाढ होउन प्राथमिक आरोग्य केंद्र अपुरे पडत आहे. भविष्यातील गरज लक्षात घेता सरपंच, उपसरपंच, ग्रा. प. सदस्य यांनी आ. भुमरे यांच्याकडे मागणी केली होती. या वेळी सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

### डिजिटल मीडिया परिषदेची अंबाजोगाई तालुका कार्यकारणी जाहिर

## अध्यक्ष अभिजीत लोमटे,कार्याध्यक्ष सतीश मोरे तर सचिवपदी मोहम्मद फैजान

**अंबाजोगाई | परवेज पटेल**

अंबाजोगाई मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा एस एम देशमुख सर यांच्या नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिलजी वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषद तालुका अंबाजोगाईची कार्यकारणी डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी जाहीर केली आहे.
डिजिटल मीडिया परिषद तालुका अंबाजोगाई च्या अध्यक्षपदी संग्राम महाराष्ट्राचा न्यूज चे संपादक अभिजीत लोमटे, कार्याध्यक्ष अंबाजोगाई दर्शन न्युज चे संपादक सतीश मोरे,उपाध्यक्ष न्यूज लोकमन संपादक संजय जोगदंड, उरुज न्यूज चैनल संपादक आरेफ सिद्दिकी, ए एम न्यूज संपादक अमोल माने (ग्रामीण ),सचिवपदी सरकार एक्सप्रेस न्यूज चॅनल प्रतिनिधी मोहम्मद फैजान, सहसचिव सचिन मोरे,ता संघटकपदी योगेश्वरी न्यूज चॅनलच्या संपादक नागेश अवताडे,युवाशक्ती न्यूज प्रतिनिधी सय्यद नईम,कोषाध्यक्ष एन टीव्ही न्यूज प्रतिनिधी मनोज कोकणे,सहकोषाध्यक्ष जंग न्यूज प्रतिनिधी अहमद पठाण, कार्यक्रम प्रमुखपदी गोल्डन मीडिया न्यूज चॅनलचे गजानन वांगीकर चौधरी,प्रसिद्धी प्रमुख सूर्योदय न्यूज चॅनलचे बालाजी देशमुख,योगेश डाके यांची नूतन कार्यकारणी मध्ये निवड करण्यात आली आहे.
डिजिटल मीडिया परिषद तालुका अंबाजोगाई कार्यकारणी जाहीर होताच निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे राजकीय सामाजिक क्षेत्रातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.







## नायगावात राज्य भाषा मराठीच्या पेपरला ५९ विद्यार्थ्यांनी फिरवली पाठ

### २५४७ पैकी २०८८ विद्यार्थ्यांनीच परीक्षा दिली

**नायगाव | हनुमंत चंदनकर**

मंगळवार दी. ११ पासून इयत्ता १२ वी च्या परीक्षेला सुरवात झाली असूनदिनांक १३ रोजी राज्य भाषा मराठी हा विषय होता.यामध्ये नायगाव तालुक्यात ९ परीक्षा केंद्रावर २५४७ पैकी २०८८ च विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून,५९ विद्यार्थी आनूपस्थित राहिल्याने ते परीक्षे पासून वंचित राहिले आहेत अशी माहिती नायगाव परिरक्षक कार्यालय अधिकारी आनंद एन . रेंनगुंटवार सर यांनी दिली.
परीक्षा केंद्रावर साहित्य पोहचवणे ते साहित्य जमा करून पोस्ट कार्यालय मार्फत बोर्ड कडे पाठवणे ही जबाबदारी आनंद रेंनगुंटवार सर आपल्या सहायक परीरक्षक असलेल्या चंद्रकांत आमलापुरे,एस डी पाचलिंग सर ,बालाजी पटलेवाड सर,रुपेश गाडेवाडसर,आंगरोड सर,मठपती सर या सह अन्य एकूण २५ शिलेदार यांच्या सह सेवक वर्ग याना



साथीला घेऊन अतिशय चोख पने करीत आहेत.

## कु.दिपाली हिवर्डेची सहाय्यक महसूल अधिकारी पदावर नियुक्ती झाल्याबद्दल केला सत्कार

**छ. संभाजीनगर | प्रा संजय तुपे**

जगद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या आशीर्वादाने पुज्य बाबाजींचे उत्तराधिकारी जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या आशीर्वादाने तसेच संस्थेचे सचिव महंत १०८ स्वामी सेवागिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने गुरुकुल विकास समिती यांच्या मार्गदर्शनाने श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाची (गुरुकुल) वेरुळ ची अतिशय गरीब शेतकरी कुटुंबातली विद्यार्थिनीं कु. दिपाली धोंडीराम हिवर्डे सदर गुरुकुलातील माजी विद्यार्थीनीने एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश मिळवले. गुणवत्ता यादीतून सहाय्यक महसूल पदाधिकारी म्हणून तिची



निवड करण्यात आली. या यशाबद्दल जय बाबाजी भक्त परिवाराचे प्रवक्ते श्री राजेंद्रजी पवार, श्री गणपत मस्के, श्री मनोहर गावडे, श्री गोपाल नवले, श्री उगले साहेब व विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री अधाने गुरुजी यांनी कु.दिपाली हिवर्डे हिचा सत्कार करण्यात आला. दिपाली ने मिळवलेल्या यशाबद्दल पूज्य बाबाजी कडून व संस्था तसेच वेरुळ गुरुकुलातील प्राचार्य श्री बोरसे गुरुजी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून कु. दिपालीचे अभिनंदन करुन व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## शिदोड येथील शैलेश दिलीप जोगदंड याची महसूल सहाय्यक पदी निवड


**बीड | प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून शिदोड ता.जि.बीड या गावातील सुपुत्र शैलेश दिलीप जोगदंड याने एम.पी.एस.सी. या परीक्षेमध्ये कठोर मेहनत, चिकाटी, परिश्रम घेऊन आणि त्यामध्ये सातत्य ठेवत यश प्राप्त केले.
शैलेश जोगदंड यांने आपल्या आई वडिलांच्या कष्टाची परिश्रमाची जाणीव ठेवत दिवसरात्र अभ्यास करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत मंत्रालयात महसूल सहाय्यक पद मिळवले. शैलेश जोगदंड च्या या यशामध्ये आई–वडिलांसह मोठ्या भावंडांचा देखील मोठा वाटा आहे. शैलेश जोगदंड हे पत्रकार नितीन जोगदंड यांचे पुतणे आहेत. यश मिळवलेल्या शैलेश वर मित्रपरिवार नातेवाईक आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच परिसरातील लोकांकडून शुभेच्छांचा वर्षा होत असून पुढील कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा देत आहेत.



संपादकीय

# प्रसाद असावा सात्विक!



विविध धर्मीयांच्या प्रार्थनास्थळांमध्ये प्रसादातील नानाविध प्रकारच्या पदार्थांचा समावेश असतो. कोणत्या स्वरूपामध्ये भाविकांना प्रसाद देण्यात यावा, याला काही निश्चित निकष नाही. भाविकांसाठी मंदिरांसह प्रार्थनास्थळांमध्येही जेवणाचीही सुविधा असते. प्रसाद कशा स्वरूपामध्ये द्यावा, असे कोणतेही निश्चित निकष नाहीत. वातावरणातील बदल, भाविकांची वाढती गर्दी, मंदिराला मिळणारी आर्थिक मदत, दान याचाही परिणाम प्रसादाच्या स्वरूपावर होत असतो, याकडे जाणते लक्ष वेधतात. काही ठिकाणी मंदिरामध्ये, प्रार्थनास्थळी प्रसादाचे वितरण केले जाते, तर अनेक ठिकाणी प्रार्थनास्थळांच्या बाहेर भाविकांना प्रसाद दिला जातो. हा प्रसाद कधी देवाला द्यायच्या फुलानारळाच्या ताटामध्ये असतो, तर कधी भाविकांना घरी नेण्यासाठी वेगळा दिला जातो. या प्रसादाचीही गुणवत्ताचाचणी करणे गरजेचे आहे. मात्र ती केली जात नाही.

**वेगळा विचार नाही**

मंदिरातून देण्यात येणारा प्रसादाच्या गुणवत्तेचा तपासणीच्या निकषावर वेगळा विचार केला जात नाही. अन्नपदार्थ म्हणून त्याकडे पाहिले जाते. प्रसाद तयार करताना त्यामध्ये कोणते घटकपदार्थ वापरले जातात याची तपासणी होत असते. उदा. तूप, साखर, रवा, मैदा, बेसन यांसारख्या घटक पदार्थांची गुणवत्ता काय आहे, हे तपासून पाहिले जाते. घटक पदार्थांची गुणवत्ता तपासली म्हणजे तयार होणारी अंतिम पदार्थांची, प्रसादाची गुणवत्ता चांगलीच असेल, असा निश्चित अंदाज बांधला जातो. मात्र प्रक्रियेमध्ये पूर्णपणे तयार झालेल्या प्रसादाची गुणवत्ताही तपासायला हवी, असा आग्रह तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. हा प्रसाद कोणत्या ठिकाणी ठेवला जातो, त्याची साठवणूक कशी होते, साठवणुकीचा मुदत कालावधी किती आहे, त्या कालावधीमध्ये प्रसादाचे वितरण केले जाते का, याकडे अत्यंत गांभीर्याने पाहायला हवे. मुदतबाह्य प्रसाद आरोग्यासठी अपायकारक ठरू शकतो. प्रसाद तयार करताना साजूक तूप, दूध वा दर्जेदार दुग्धजन्य पदार्थांऐवजी निकृष्ट दर्जाच्या पदार्थांचा वापर करणे आरोग्यासाठी अपायकारक ठरू शकते. त्यामुळे एका ठोस व निश्चित नियमावलीची गरज प्रसादासाठी आहे, अशी मागणी आता पुढे येत आहे.

**अन्ननिरीक्षकांची नियुक्ती**

तिरुपती वादाच्या पार्श्वभूमीवर आता राज्यातील काही प्रार्थनास्थळांमध्ये अन्ननिरीक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. अन्नशास्त्रामध्ये प्रावीण्य असलेल्या सदस्यांची समिती स्थापन करणे, नियमित तपासणी करणे, प्रसाद तयार करण्यापासून ते त्याचे पॅकिंग करेपर्यंत सर्व सूचनांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जाते का, हे अन्ननिरीक्षकांच्या माध्यमातून तपासण्यात येणार आहे. मंदिर तसेच प्रार्थनास्थळी येणाऱ्या भाविकांच्या आरोग्यासह त्यांच्या श्रद्धेचीही जपणूक यामुळे होणार आहे. महाप्रसाद तसेच कोरड्या प्रसादाची गुणवत्ता निश्चित करण्यासाठीही याची मदत होणार आहे. मंदिरामध्ये लावण्याच्या दिव्यांसाठी चांगल्या प्रतीचे तेल व तूप वापरले जाते का, याची खातरजमा करण्यासाठीही अन्ननिरीक्षकांची मदत होणार आहे.

**भोग उपक्रमाची मदत**

प्रार्थनास्थळांमार्फत वितरण केल्या जाणाऱ्या या प्रसादाचा दर्जा सुधारावा आणि त्याची गुणवत्ता कायम राहावी, यासाठी अन्न व प्रशासनाने 'भोग' हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत या प्रार्थनास्थळांवरील प्रसादाची गुणवत्ता तपासणे, त्याठिकाणी वापरण्यात येणाऱ्या पाणी, प्रसादासाठी वापरण्यात येणाऱ्या घटक पदार्थांची तपासणी करणे तसेच प्रसाद आणि इतर पदार्थ तयार करताना स्वच्छतेच्या निकषांचे पालन होते का, याचीही तपासणी होणार आहे. प्रसाद तयार झाल्यानंतर वैद्यकीय पद्धतीनेही त्याची तपासणी करण्यात येणार आहे. सध्या राज्यातील २४ प्रार्थनास्थळांमध्ये 'भोग' उपक्रमाअंतर्गत प्रसाद प्रमाणित करण्यात येणार आहे.

**प्रयोगशाळांची व्याप्ती वाढवण्याची गरज**

अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळांवर अन्न आणि औषधांच्या चाचण्या करण्यासंदर्भात असलेला ताण दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक ठिकाणचे अन्न तसेच औषधांचे नमुने चाचणीअभावी प्रलंबित आहेत. तज्ज्ञ कुशल मनुष्यबळाचा अभाव यामुळे या प्रसादाची गुणवत्ता चाचणी करण्याचे अतिरिक्त काम कसे घ्यायचे, हा प्रश्न प्रशासनातील तज्ज्ञांनी उपस्थित केला. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने निश्चित नियमावली व निकषांसाठी मार्गदर्शन करावे व त्याची अंमलबजावणी देशात एकाच पद्धतीने होते का, हे तपासावे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# वित्ताचे तंत्रज्ञान, तंत्रज्ञानातील वित्त

'मूळ माहिती', 'संकलित माहिती', 'नोंदवलेली माहिती' असे काळानुरूप माहितीचे प्रकार पडले आहेत. या माहितीचा 'केवळ संकलित माहिती' अर्थात डेटा हा एक प्रकार. हा प्रकार विद्यार्जन, तंत्रार्जन आणि अर्थार्जन यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. डेटा ही आजच्या जगातली सर्वात मौल्यवान मत्ता (असेट) आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. आपल्या देशात झालेल्या डिजिटल पेमेंट क्रांतीचा फार मोठा आधार हा डेटा आहे. या डेटाला योग्य पद्धतीने मार्गस्थ करण्याचं, त्याच्या संरक्षणासाठी सज्ज राहण्याचं आणि त्याच्या साह्याने आपलं जीवन सुकर करण्याचं तंत्रज्ञान आज आपण स्वतः तयार करत आहोत. या तंत्रज्ञानाचा वापर आपण 'डिजिटल पेमेंट' हा दोन अक्षरी मंत्र सिद्ध करण्यासाठी करतोय. हे तंत्रज्ञान म्हणजेच वित्त-तंत्रज्ञान अर्थात 'फिनटेक' होय. देशात फिनटेकला यंदा दोन दशकं पूर्ण होत आहेत. जगात फिनटेक क्षेत्रात समर्थपणे वावरणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक तिसरा आहे. फिनटेकमध्ये आपल्या देशात नऊ हजार कंपन्या कार्यरत असून या क्षेत्रात छोट्या-मोठ्या कंपन्यांनी ५८.२० अब्ज डॉलरची गुंतवणूक केली आहे. आपल्याला गरीब राष्ट्र, तिसऱ्या जगातलं राष्ट्र असं आजही हिणवणाऱ्या देशांना आपल्या फिनटेक प्रगतीनं आपण तोंडात बोटं घालायला लावलं आहे. देशातली स्थिती पाहिली तर लक्षात येईल, की आपण फिनटेकचा स्वीकार जगातील फिनटेक स्वीकाराच्या तुलनेत ८७ टक्के केला आहे. दोन व्यवसायांमधले व्यवहार (बीटूबी), दोन व्यवसाय व ग्राहक यांच्यातले व्यवहार (बीटूबीटूसी), दोन ग्राहकांमधले व्यवहार (सीटूसी) अशा अनेक आघाड्यांवर आपण आज फिनटेक वापरत आहोत.

**करोनाची इष्टापत्ती**

इंग्रजीमध्ये लश्रर्शीीळपस ळप वळीर्सीीळीश असा वाकप्रचार आहे. करोनाचा संसर्ग आणि त्यातून करावे लागलेलं लॉकडाउन हे भारतीय फिनटेकसाठी लश्रर्शीीळपस ळप वळीर्सीीळीश ठरलं. घरातून बाहेर पडताच येत नाही आणि नित्य गरजेच्या वस्तूंचा पुरवठा होणं तर गरजेचं आहे, अशा विचित्र परिस्थितीत काहीशा नाईलाजाने आपण मोबाइलच्या साह्याने पेमेंट पद्धत स्वीकारली. त्यावेळी पेमेंट क्षेत्रात आपण काहीतरी भव्यदिव्य करत आहोत याची कल्पना ही सेवा तयार करणाऱ्यांना आणि तिचे वापरकर्ते आपण यांना कदाचित आली नसावी. यथावकाश मात्र त्यावाचून आपलं सगळीकडे अडायला लागलं. फिनटेकचा स्वीकार हा असा नाईलाजाने का होईना केला गेला आणि आज तो आपल्या जीवनाचं अविभाज्य अंग बनलाय. युनिफाइड पेमेंट इंटरफेस किंवा यूपीआय आठ वर्षांपूर्वी अस्तित्वात आलं. त्याची भरभराट करोना काळात झाली असं म्हणावं लागेल.

**फिनटेकचा 'दादा' देश**



नुकतीच ग्लोबल फिनटेक फेस्ट ही तीन दिवसांची जागतिक परिषद मुंबईत झाली. या परिषदेत ८०० ते एक हजार कंपन्यांनी दालनं उभारली होती, ज्यातून फिनटेकचं दिमाखदार प्रदर्शन मांडलं गेलं. यामुळे फिनटेक क्षेत्रात आपला प्रभाव दिसून आला. कंपन्यांबरोबरच फिनटेक धोरणकर्ते, नेते, स्टार्टअप, कल्पक उद्योजक यांचाही यात सहभाग होता. जागतिक परिप्रेक्ष्यातून या घटनेकडे पाहिल्यास भारताचं वर्चस्व या क्षेत्रात निर्माण झालंय हे अधोरेखित झालं.युरोप आणि अमेरिका हे प्रदेश आर्थिक देवाणघेवाणीच्या बाबतीत अजूनही धनादेशासारख्या पारंपरिक साधनांना चिकटून आहेत. भारतातला यूपीआयचा उदय, स्वीकार, प्रसार आणि त्याची उपयोगिता (जी काळाच्या कसोटीवर उतरली आहे.) ही स्पष्ट दिसू लागल्यावर आता युरोप आणि अमेरिका या प्रदेशांकडून 'यूपीआय आम्हालाही द्या' अशी मागणी होऊ लागली आहे. डिसेंबर २०१९मध्ये अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेल्या यूएस फेडरल रिझर्व्हच्या संचालक मंडळाला गुगल कंपनीने सल्लाच दिला, की यूपीआयची कार्यपद्धती समजावून घ्या आणि तसं काहीतरी अमेरिकेत देखील आणा! २०११मध्ये आपल्या देशात सर्वसामान्य नागरिकांकडून रोकडविना अदायगीचे (नॉन कॅश पेमेंट) केवळ सहाच व्यवहार झाले, पण त्याच वर्षात किरकोळ दुकानांतून कार्डाने पेमेंटचे एक कोटी व्यवहार झाले. लोक रोकड टाळून कार्डाकडे वळत आहेत हे एक तर रिझर्व्ह बँकेच्या लक्षात आलं आणि लक्षात आलं सायबर चोरांच्या! डेबिट असो की क्रेडिट, कोणत्याही कार्डाचं क्लोनिंग करता येतं हे उघड झालं आणि मग मात्र विनाकार्ड पेमेंट व्यवहार आवश्यक वाटू लागले. या गरजेतून विनारोकड पेमेंटसाठी एक स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध होणं आणि ती सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होणं, त्यातही ती नागरिकांच्या मोबाइलमध्ये उपलब्ध होणं ही काळाची गरज बनली. या सगळ्या विचारमंथनातून २००९मध्ये स्थापन झालेल्या नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशनने (एनपीसीआय) यूपीआय विकसित केलं. यूपीआय सुपर-डुपर हीट झालंय.

**भारतीय फिनटेकची वैशिष्ट्ये**

आपलं फिनटेक हे सर्वसमावेशक आहे. या फिनटेकचा मुख्य आधार यूपीआय हा आहे. यूपीआय हा विनारोकड पेमेंटसाठी एक मंच आहे आणि या मंचावर अनेक प्रणाली सहजगत्या लाँच करता येतात. उपयुक्त फिनटेक बाजारात आणल्यास केंद्र सरकारही मदत करण्यासाठी उत्सुक आहे. अद्यापही बँक शाखेत प्रत्यक्ष न जाता घरबसल्या मोबाइलवरून आर्थिक व्यवहार करण्यासाठी लोक घाबरताना दिसतात. विशेषतः ग्रामीण भागात स्त्रियांना ही भीती जाणवत असते. फिनटेक देशात आणखी यशस्वी करायचं असेल तर समाजाच्या सर्व स्तरांमध्ये याविषयी पुरेशी जागृती करणं गरजेचं आहे. एकंदर डिजिटल इकोसिस्टिमबाबत लोकांच्या मनात असलेली शंका लवकरात लवकर फिटणे गरजेचे आहे. वापरकर्त्यांच्या भाषेत बोलणाऱ्या आणि वापरण्यास अत्यंत सोप्या अशा सुविधा तसंच अशी अप हे आपल्या फिनटेकचं सर्वात मोठं वैशिष्ट्य आहे.

**फिनटेकसमोरील आव्हाने**

पुढचं दशक हे फिनटेकसाठी अत्यंत महत्त्वाचं आहे. अर्थात हे वाक्य दरवर्षी म्हटलं तर हे दशकही एकेक वर्षानं पुढे जाईल. त्यामुळे २०२४ पासून २०३५पर्यंतचा काळ भारतीय फिनटेकसाठी फार महत्त्वाचा आहे, असं म्हटल्यास चुकीचं ठरणार नाही. या काळात भारतीय फिनटेकसमोरील आव्हानांचा विचार केला तर काही ठळक आव्हाने दिसतात -

१. स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पेमेंट व्यवहार करताना ते विविध देशांच्या पेमेंट पद्धतींना सामावून घेणारे असे करणे हे मोठं आव्हान आहे. सध्या ज्याला आपण क्रॉस बॉर्डर म्हणतो, तसे व्यवहार करताना अडचणी येत आहेत. यूपीआय हा जर सर्व डिजिटल व्यवहारांचा आधार मानला, तर हे यूपीआय आपल्या देशात वापरू देण्यासाठी अजून अनेक देश तयार नाहीत. काही ठिकाणी राजकीय आडमुठेपणा तर काही ठिकाणी तंत्रज्ञानाची अपूर्णता अशी कारणं आहेत.

२. देशात तयार होणाऱ्या फिनटेकला आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्याचं मोठं आव्हान आपल्या कंपन्यांसमोर आहे.

३. तंत्रज्ञानाची निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता आहे.

४. कोणतंही फिनटेक वापरता त्या तंत्रज्ञानाने देशातील सर्व माहिती तंत्रज्ञानविषयक कायद्यांचे पालन केलेलं असणे आवश्यक आहे. तसंच हे तंत्रज्ञान वापरणाऱ्याला यापासून किती जोखीम घ्यावी लागेल तेही स्पष्ट होणे आवश्यक आहे.

५. फिनटेक पर्यावरणानुकूल असणं महत्त्वाचं आहे.

६. आर्थिक घोटाळे आणि सायबर फसवणूक ही दोन मोठी आव्हाने आज फिनटेक कंपन्यांसमोर उभी आहेत.

**काही महत्त्वाची पावले**

१. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि आर्थिक सेवा यांची एकमेकांशी सांगड घालण्यात आली आहे. त्यामुळे आता वित्तसंस्थांना बॉट, चॅटबॉट यांच्या माध्यमातून ग्राहकाशी थेट संवाद साधणं शक्य होत आहे. यामुळे डिजिटल व्यवहाराची सुरक्षितता वाढली आहे.

२. रिझर्व्ह बँकेकडून सेंट्रल बँक डिजिटल करन्सी अर्थात ई-रुपयाचा वापर नागरिकांसाठी अधिक सुलभ करण्यात आला आहे. ई-रुपया ग्राहकांना देण्यासाठी एचडीएफसी बँक, कॅनरा बँक अशा काही प्रमुख बँकांना परवानगी देण्यात आली आहे. यामुळे रोकड प्रत्यक्ष बाळगण्याची जोखीम संपली आहे.


३. कार्डविरहित एटीएमला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिलं जात आहे. त्याचप्रमाणे कार्डविरहित व्यवहारांनाही चालना दिली गेली आहे.

४. बीटूबी व्यवहारासाठी भारत बिलपे ही सुविधा एनपीसीआयने आणली आहे. वापरकर्त्यांना स्वतः सर्व प्रकारची पेमेंट आपसात थेट करता यावीत यासाठी यूपीआय सर्कल ही सुविधा एनपीसीआयने बाजारात दाखल केली आहे.

फिनटेक ही काळाची गरज तर आहेच, शिवाय हे तंत्रज्ञान आता आपल्या दैनंदिन व्यवहारांचा कणा ठरलं आहे. हे तंत्रज्ञान नवं असलं आणि म्हणून ते लोभस असलं तरी ते जबाबदारीनं हाताळण्याची गरज आहे. म्हणून फिनटेकची कोणतीही सुविधा स्वीकारताना त्याविषयी पुरेशी माहिती घेणं महत्त्वाचं आहे. अशी माहिती घेताना स्वतःच्या माहितीचा कुठेही कोणाकडून दुरूपयोग केला जाणार नाही याचीही खात्री बाळगणं महत्त्वाचं आहे. अशी सर्व खबरदारी बाळगल्यास येणारं दशक हे भारतीय फिनटेकचंच असेल याच काही शंका नाही.

# जग भारताविषयी आशावादी का आहे?

जग सध्या अनेक भूराजकीय पेचप्रसंगात अडकलेलं आहे आणि महागाईच्या आगीतून बाहेर पडता पडता मंदीच्या फुफाट्यात फेकलं जातंय की काय, याची चर्चा सुरू आहे. पण अशा वेळी सर्वच देश आणि आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था भारताच्या आर्थिक प्रगतीची प्रशंसा करताना दिसत आहेत. जेपी मॉर्गन या अमेरिकेतील सर्वात मोठ्या वित्तसंस्थेचे जागतिक अध्यक्ष जेमी डिमॉन यांनी अलीकडेच त्यांच्या भारतभेटीत भाकीत केलं की या दशकाअखेर भारत सात ट्रिलियन डॉलरची उंची गाठू शकेल, तर त्यांचे कार्यकारी संचालक जेम्स सलिव्हन यांनी भारतात १०० बिलियन डॉलरच्या नवीन गुंतवणुका येऊ घातल्या असल्याचं विधान केलं. जेपी मॉर्गन जगातील ८५० मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भारतातील व्यवहार सांभाळते आणि साहजिकच विदेशी कंपन्या आणि गुंतवणूकदार यांचा भारताकडे वळणारा कल त्यांना सगळ्यात आधी जाणवणार हे खरं. मात्र महत्त्वाचं हे आहे की, भारताविषयी आशावाद व्यक्त करणारे ते एकटेच नव्हेत.गेल्याच आठवड्यात भारत-अमेरिका स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप फोरम या संस्थेचे अध्यक्ष तसेच सिस्को या कंपनीचे मानद अध्यक्ष असलेल्या जॉन चेंबर्स यांनी 'भारत पुढील तीन-चार दशकांत चीनला ओलांडून जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थसत्ता बनेल, आणि या शतकाच्या शेवटी आर्थिकदृष्ट्या चीनच्या जवळजवळ दुप्पट झालेला असेल,' असं भाकित वर्तवलं. गेल्या आठवड्यात आलेल्या एस अँड पी ग्लोबल या जागतिक पतमापन संस्थेच्या अहवालात भारताचा चालू वर्षाचा वृद्धिदर ६.८ टक्के तर पुढील वर्षाचा वृद्धिदर वाढून ६.९ टक्के होईल, असे म्हटले आहे. काहीच दिवसांपूर्वी डेलॉइट या वित्तसंस्थेने भारताचे वर्णन 'जगाच्या निराशाजनक पार्श्वभूमीवर आशेचा किरण' असं करताना भारत सात टक्क्यांचा वृद्धिदर कायम ठेवू शकेल, असा विश्वास व्यक्त केला होता.सप्टेंबरच्या सुरुवातीला जागतिक बँकेने भारताच्या वृद्धिदराचे अंदाज आधीच्या ६.६ टक्क्यांवरून ७ टक्क्यांवर नेले होते. अशाच प्रकारे त्याआधी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि एशियन डेव्हलपमेंट बँक यांनी देखील भारताविषयीचे अंदाज वरच्या दिशेने बदलले होते. तर मूडीज या पतमापन संस्थेनेदेखील गेल्या महिन्यात भारताविषयीच्या अंदाजात



वाढ केली. 'भारतीय अर्थव्यवस्थेने व्याजदर वाढलेले असताना आणि सरकार वित्तीय तूट कमी करत असताना देखील एप्रिल-जून २०२४ तिमाहीत ७.८ टक्क्यांचा वृद्धिदर गाठला. उद्योग तसेच सेवा या दोन्ही क्षेत्रांनी भरघोस कामगिरी दर्शवली. त्यातही सेवा क्षेत्रासाठी मागणी वेगाने वाढत आहे,' अशी टिप्पणी त्यांनी केली. अशा उदाहरणांची यादी खूप मोठी आहे.

माध्यमांतून सर्वसाधारणपणे गुन्हेगारी, अपघात, राजकीय साठेमारी, बंद, मोर्चे, तणाव अशा गोष्टी प्रामुख्याने बघणाऱ्या, वाचणाऱ्या सामान्यांना कदाचित हे सगळं काहीतरी वेगळं, क्षणभंगुर, अविश्वसनीय वाटू शकेल. परंतु एकीकडे स्थानिक पातळीवर शांतता आणि सुव्यवस्था किंवा रस्ते, पाणी, वीज, सार्वजनिक स्वच्छता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत सुविधांविषयी प्रश्न वाढत चाललेले असतानादेखील दुसरीकडे भारत शेतकी तसेच औद्योगिक उत्पादन, आंतरराष्ट्रीय व्यापार, रस्ते, रेल्वे, बंदरं किंवा विमानतळ यांसारख्या पायाभूत सुविधा, वाहतूक क्षेत्र, किंवा डिजिटल तंत्रज्ञानामार्फत पुरवता येणाऱ्या सेवासुविधा अशा अनेकविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रगती करतो आहे, गुंतवणूक करतो आहे. त्याचा परिणाम म्हणजे १९९० च्या सुमारास असलेलं भारतीयांचं सरासरी ३०० डॉलरचं दरडोई उत्पन्न आजमितीला २७०० डॉलरवर जाऊन पोचलं आहे. आता होत असलेली प्रगती त्यात सातत्यानं भर घालत आहे, आणि त्यातून हळूहळू सर्वसामान्यांचं जीवनमान उंचावत आहे.आज ३.५ ट्रिलियन डॉलर असलेली भारताची जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था २०२७पर्यंत तिसऱ्या क्रमांकावर पोचेल आणि २०३० पर्यंत सात ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल, अशी अपेक्षा आज व्यक्त केली जात आहे. पुढील सहा-सात वर्षांत आणखी ३.५ ट्रिलियन डॉलर्स वाढवायचे म्हणजे दरवर्षी सरासरी ५०० - ५५० बिलियन डॉलरची वाढ होत राहिली पाहिजे. आत्ताच भारत दरवर्षी ४०० बिलियन डॉलरची वाढ करत आहे, त्यामुळे हे लक्ष्य अशक्य नाही.मोठ्या प्रमाणावर नवीन पायाभूत सुविधांची निर्मिती हा भारताच्या उन्नतीचा पाया ठरत आहे. भारताने गेल्या सात-आठ वर्षांत तब्बल एक ट्रिलियन डॉलर्स एवढी गुंतवणूक पायाभूत सुविधांमध्ये केली आहे आणि तेवढीच गुंतवणूक पुढील पाच-सहा वर्षांत करणार आहे. त्यामुळेच २०१४ साली अवघ्या पाच शहरांत २५०किमीमध्ये असलेली मेट्रो आता २१ शहरांमध्ये १००० किमी मार्गावरून धावते आहे, तर पुढील १,००० किमीचे मेट्रोमार्ग बनत आहेत. विमानतळांची संख्या ७४ वरून आता १५८ झाली आहे, तर २१ नवीन विमानतळ बनत आहेत, विद्युतीकरण केलेल्या रेल्वे लाइन्स २१,००० किमी वरून ६३,००० किमी झाल्या, हायवे दुप्पट झाले, देशातल्या ९९ टक्के खेड्यांपर्यंत पक्की सडक, वीज, सिलिंडर, मोबाईल नेटवर्क, इंटरनेट इत्यादी पोहोचले आहेत.

भारताने हरित ऊर्जेच्या उत्पादनातदेखील मोठी मजल मारली आहे. गेल्या १० वर्षात सौरऊर्जेची उत्पादन क्षमता २५ पट वाढली आहे, तर जैवऊर्जेचा वापर आठपट झाला आहे. सौरऊर्जेच्या उत्पादनात भारत आता जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे, तर त्यातील गुंतवणुकींसाठी भारत हा जगातील सर्वोत्तम देश गणला जात आहे.डिजिटल क्षेत्रातील भारताची क्रांती तर सर्वश्रुत आहेच. आज भारतात जगातील सर्वात स्वस्त, पण सर्वोत्तम मोबाइल इंटरनेट सेवा उपलब्ध आहे. भारत जगातील सर्वाधिक इंटरनेट वापरणारा देश बनला आहे. सरकारच्या पाठिंब्याने निर्माण झालेल्या डिजिटल सार्वजनिक सुविधा यांनी सरकारी सोयीसुविधांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला मदत केली असून त्याने संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे. त्यामुळेच भारत आज डिजिटल पेमेंटमध्ये जगात अव्वल ठरला आहे. आणि या सगळ्यांमुळे व्यापारउदिमाला चालना मिळालीच आहे, पण त्याचबरोबर प्रचंड प्रमाणावर स्टार्ट-अप्सना चालना मिळाली आहे. भारतातील स्टार्ट-अप्सची संख्या २०१४ मध्ये अवघी ४००-५०० होती ती आजमितीला १,४०,००० च्या वर गेली आहे, आणि 'युनिकॉर्न' च्या संख्येत भारत जगातील तिसरा देश बनला आहे.भारताची निर्यात वेगाने वाढते आहे आणि त्यामुळे व्यापारातील चालू खात्यातील तूट खूपच कमी झाली आहे. परकीय चलनाची गंगाजळी ओसंडून वाहते आहे आणि आंतरराष्ट्रीय बाजारात रुपया आपलं मूल्य टिकवून आहे. महागाई गेल्या पाच वर्षांतल्या नीचतम पातळीवर आहे. तर स्टेट बँकेने केलेल्या संशोधनानुसार देशांतर्गत आर्थिक विषमता देखील गेल्या आठ वर्षांत १५ टक्क्यांनी घटली आहे. अशा पद्धतीनं सर्वांगीण विकासाच्या गगनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करताना भारताने अमेरिका, जपान, चीन आदी देशांप्रमाणे बेफिकीर आर्थिक धोरणे अंगिकारली नाहीत, हे विशेष आहे. पायाभूत सुविधांवर वाढती गुंतवणूक करताना वित्तीय तूट कमी कशी होत राहील, यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन प्रयत्नशील आहेत. पुढील वर्षी ही तूट देशाच्या अर्थव्यवस्थेच्या ४.५ टक्क्यांपर्यंत सीमित करून कर्जांचा बोजा कमी कसा होत राहील, त्याकडे सरकारचे लक्ष असेल. अशा धोरणांमुळेच भारताची भविष्यातील वेगवान वाटचाल निष्कंटक आणि अधिकाधिक खात्रीपूर्ण होत जाईल. त्यामुळे बाहेरील लोकांनी भारतात येऊन भविष्यातील विकाससंधींचा फायदा उचलण्याआधीच आपण भारतीयांनी जमेल त्या मार्गाने स्वतःला त्यासाठी सुदृढ, सुयोग्य बनवून सहभागी होणं ही काळाची गरज आहे.

# अबॅकस जागतिक सर्वोत्कृष्ट यशस्वी विद्यार्थिनी आरोही दादाराव उजगरेला सर्वोत्कृष्ट जागतिक चॅम्पियनशिप चॅम्पियन अबॅकस स्पर्धक मानद साईटेशन

**बीड । प्रतिनिधी**

यशस्वी अबॅकस विद्यार्थ्यांची तयारी करण्यासाठी अबॅकसला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होत असून शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये आरोही दादाराव उजगरेने ऐतिहासिक यश संपादन केलेले आहे. आरोही दादाराव उजगरेने पाच मिनिटांमध्ये शंभर प्रश्न सोडवल्यामुळे समाजातील सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन होत असून चॅम्पियनशिप-चॅम्पियन म्हणून विद्यार्थ्यांनिचा शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींद्वारे सत्कार करण्यात आलेला असून २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या लंडन अबॅकस चॅम्पियनशिपसाठी आरोही दादाराव उजगरेची निवड करण्यात आलेली आहे. वर्ल्ड अबॅकस चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अमेरिका, तैवान, चीन, जपान, सिंगापूर अशा जगातील ११ देशातील १९४३ एकूण विद्यार्थ्यांपैकी आरोही दादाराव उजगरेची चॅम्पियनशिप चॅम्पियन फर्स्ट यश मिळवून जागतिक स्तरावर निवड झालेली आहे. इंटरनॅशनल अबॅकस स्पर्धेमध्ये ब्रेन किड्स स्तरावरील प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस इंटरनॅशनल सर्वोत्कृष्ट जागतिक विद्यार्थ्यांचे प्रथम यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमांमध्ये अबॅकस मास्टर ट्रेनर डॉ घोडके सर प्रमुख अतिथी म्हणून उत्कृष्ट गणितीय शिक्षक श्री संतोष शेकडे यांनी सत्कार करून यशस्वी विद्यार्थ्यांनी गेल्या चार ते पाच महिन्यापासून सतत प्रयत्न केल्यामुळे यश मिळालेले आहे असे प्रतिपादन केले तसेच अबॅकस तंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो आणि बुद्धिमत्तेचा सर्वोत्कृष्ट विकास होतो असे विशेष मार्गदर्शन डॉ. घोडके एस ए. यांनी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शैक्षणिक अडचणींना सामोरे जाण्यासाठी अबॅकसचा उपयोग होऊन अबॅकस स्मार्ट वर्क प्रयत्नांची स्तुती केली आहे. आरोही उजगरेचे वडिलांनी यशस्वी विद्यार्थ्यांना पालकांनी शिक्षकांनी सतत योग्य ते मार्गदर्शन करून आरोहीला यश प्राप्त करण्यास सहकार्य केलेली आहे. आरोही दादाराव उजगरेची ऑनलाइन लंडन अबॅकस २७ मे २०२५ महिन्यामध्ये होणाऱ्या जागतिक अबॅकस चॅम्पियनशिप करीता आरोही उजगरे विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

**शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास तसेच विद्यार्थ्यांचा गणितामधील आवड निर्माण होऊन गणिताबद्दलची मनात असलेली भीती नष्ट होऊन अनेक क्लिष्ट अशा गणितीय पद्धती सोप्या पद्धतीने सोडवल्यासाठी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, स्मरणशक्ती यांचा विकास करण्यासाठी अबॅकसचा उपयोग केला जातो असे जिल्हा अबॅकस वितरक घोडके एस ए यांनी सांगितले आहे.**

# होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत खो-खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळेचा सत्कार

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत व्यवस्थापक राहुल सावंत यांनी भारतीय महिला खो-खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हिचा गुरुवारी (दि.६) सत्कार केला.

प्रियंका इंगळे भारताला पहिला खो-खो वर्ल्ड कप जिंकून दिला आहे. त्याबद्दल तिचा ठिकठिकाणी सन्मान केला जात आहे. होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत देखील सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते नेताजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या पदवीधर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक



राहुल सावंत, होळेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक देवानंद मलदोडे, पाटोदा अंबा शाखेचे व्यवस्थापक प्रीतम गिरीगोसावी, मोरेवाडी शाखेचे व्यवस्थापक तोसिफ शेख, आडसचे शाखा व्यवस्थापक सचिन गोहोकर, सहायक शाखा व्यवस्थापक ज्ञानेश्वर बिराजदार, लिपिक पल्लवी गवांडे, सटवा मेंढके, दत्तु इंगळे, हनुमंत इंगळे, भगीरथ इंगळे यांच्यासह इंगळे कुटुंबीय, ग्रामस्थ उपस्थित होते.

# आंतरशालेय सानेगुरुजी संस्कार परीक्षेत अरबिया शेख व आरोही विखे यांचे यश

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला मुंबई आयोजित श्यामची आई या संस्कारक्षम आत्मकथनपर पुस्तकावर आधारित संस्कार परीक्षा नुकतीच जिल्हा परिषद सेमी इंग्लिश स्कूल माळेवाडी येथे दोन गटात घेण्यात आली.या स्पर्धेत मोठया गटात प्रथम क्रमांक अरबिया तायर शेख, तर आराधना निलेश रोठे आणि आराध्या किशोर पवार द्वितीय क्रमांक विभागून, तर सोहम भरत वमने आणि ईश्वरी मनोज घोडके यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. लहान गटात प्रथम क्रमांक आरोही संतोष विखे, द्वितीय क्रमांक योगेश्वरी प्रवीण गाडेकर,




आराध्या संतोष हाडके, दिव्यांका राहूल औताडे यांना विभागून तर तृतीय क्रमांक धनश्री गणेश आसने यांनी पटकावला. परीक्षेसाठी साठ विद्यार्थी बसले होते. सर्वांना श्यामची आई हे पुस्तक वाचणासाठी देण्यात आले होते.प्रथम विजयी स्पर्धकांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. सदरील कार्यक्रमाला सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, व्हाईस चेअरमन, सर्व संचालक, तंटामुक्ती अध्यक्ष, शाळा व्यवस्थापनसमिती अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक राजू भालेराव,परीक्षाप्रमुख रज्जाक शेख, मीरा ससाणे, सारिका लोखंडे, मीनाक्षी जाधव, तेजश्री जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

## राऊत साहित्यिकांना दलाल म्हणाले तर महादजी शिंदेंचाही अपमान केला

# त्यांचे पानिपत झाल्याशिवाय राहणार नाही; एकनाथ शिंदे यांचा निशाणा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील साहित्यिकांना संजय राऊत यांनी दलाल म्हटले आहे. इतकेच नाही तर त्यांनी महापराक्रमी महादजी शिंदे यांचा देखील अपमान केला आहे. त्यामुळे आता ते असेच बोलत राहिले तर त्यांचे पानिपत झाल्याशिवाय राहणार नाही. अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्या आरोपाला प्रत्युत्तर दिले आहे. मला पुरस्कार मिळाला त्यामुळेच त्यांच्या पोटात पोटशूळ उठले असल्याचा आरोप देखील शिंदे यांनी केला आहे.



शरद पवार यांनी मंगळवारी दिल्लीत आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सोहळ्यात शिवसेनेचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान केला. त्यांच्या या कृतीमुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत चांगलेच संतप्त झाले. त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना या प्रकरणी शरद पवारांवर थेट निशाणा साधला. ते म्हणाले की, राज्याचे राजकारण हे फार विचित्र दिशेने जात आहे. कोण कुणाला टोप्या घालत आहे आणि कोण कुणाच्या टोप्या उडवत आहे, कोण कुणाला गुगली टाकत आहे आणि कोण स्वतः हीट विकेट होत आहे, हे पुन्हा एकदा समजून घ्यावे लागेल. यावरुन एकनाथ शिंदे यांनी देखील आता प्रत्युत्तर दिले आहे.

या संबंधी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, मला पुरस्कार मिळाला त्यामुळे विरोधकांच्या पोटात पोटशूळ उठली आहे. ते काय बोलताहेत ते देखील त्यांना कळत नाही. त्यांनी महादजी शिंदे यांच्या सारख्या महापराक्रमी योद्ध्याचा अपमान केला. त्याचबरोबर साहित्यिकांना देखील दलाल म्हटले आहे. दिल्लीमध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. त्या साहित्यिकांचा देखील त्यांनी अपमान केला असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर या देशाचे नेते शरद पवार यांचा देखील त्यांनी अपमान केला आहे. राजकारणात राजकारणापलीकडे जाऊन काही नाती जपायची असतात. संबंध जोडायचे असतात. हे पवार साहेबांनी दाखवून दिले असल्याचे शिंदे यांनी म्हटले आहे.मी देखील माझ्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत आणि त्याआधी देखील दहा वर्षांच्या मंत्रिमंडळाच्या काळात तसेच ४० वर्षांच्या सामाजिक कार्यात देखील राजकारणाच्या कक्षेमध्ये स्वतःला बांधून घेतलेले नाही. राजकारणाच्या पलीकडे मैत्री, संबंध जपले पाहिलेत. मी ते केल्यामुळेच या राज्याचा मुख्यमंत्री होऊ शकलो, असे देखील शिंदे यांनी म्हटले आहे. आज जे आरोप करताय, दोष देताहेत, लोकांचा अपमान करताहेत. या सर्व लोकांना या महाराष्ट्रातील जनता धडा शिकवेल. विधानसभा निवडणुकीत तर त्यांच्या चारही मुंड्या चित झाल्या आहेतच. महाराष्ट्रातल्या माझ्या लाडक्या शेतकऱ्यांनी, लाडक्या बहिणी, सर्वांनी विरोधकांचे पानिपत केले आहे. त्यांना विरोधी पक्ष नेते होता येईल एवढी संख्या देखील दिली नाही. ते असेच बोलत राहिले तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत देखील त्यांच्या चारही मुंड्या चित होऊन त्यांचा सुफडा साफ होणार असल्याचा दावा एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

# तू असाच जळत रहा; भाकरी खातात मातोश्रीची आणि चाकरी पवारांची-भुसे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नवी दिल्लीमध्ये सरहद संस्थेकडून महादजी शिंदे राष्ट्रगौरव पुरस्कार देण्यात आला. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. मात्र, यावरून ठाकरे गटाने नाराजी व्यक्त केली. तसेच संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांना मिळालेल्या या पुरस्कारवर टीका केली आहे. यावर तू असाच जळत रहा, एवढेच मी बोलेन, अशी टीका शिंदे गटाचे नेते व राज्याचे मंत्री दादा भुसे यांनी केली आहे.

दादा भुसे म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अथक कष्ट करत शून्यातून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने मार्गक्रमण केलेले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने दिल्ली येथे शरद पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या गोष्टीचा महाराष्ट्राला आनंद आणि अभिमान वाटला पाहिजे.



पुढे दादा भुसे म्हणाले, परंतु काही लोकांच्या पोटात कायमचा गोळा आहे. एकनाथ शिंदे आणि आम्ही सर्व एकत्र असतानाही त्यांच्या पोटात गोळा होता, रोज त्यांची मळमळ बाहेर येते. हे भाकरी खातात मातोश्रीची आणि चाकरी करतात शरद पवारांची. मात्र एकनाथ शिंदे यांचा त्यांनी गौरव केला तरी यांच्या पोटात पुन्हा गोळा उठला. यांच्याबद्दल न बोललेले बरे. तू असाच जळत रहा, एवढेच मी बोलेन, असे म्हणत संजय राऊत यांच्यावर दादा भुसे यांनी जोरदार निशाणा साधला आहे.ज्यांनी बाळासाहेबांची शिवसेना फोडली अशा लोकांच्या सन्मानासाठी पवारांनी जायला नको होते, अशा शब्दात संजय राऊतांनी नाराजी व्यक्त केली. केवळ टीका करूनच संजय राऊत थांबले नाहीत तर दिल्लीतल्या मराठी साहित्य संमेलनालाच त्यांनी दलालांचे संमेलन ठरवून टाकले. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने कोणाचाही सन्मान केला जातोय हा मराठीचा घोर अपमान असल्याचे राऊत म्हणाले.

# जल जीवन मिशन योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी:पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई (वृत्तसंस्था)**–जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत अभियान योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून योजना सुरळीत असल्याची खात्री करण्यासाठी अधिकाऱ्यांनी क्षेत्रिय पातळीवर प्रत्यक्ष भेट द्यावी, अशा सूचना पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिल्या.मंत्रालयातील दालनात छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन विषयी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.मंत्री श्री. पाटील म्हणाले, जल जीवन मिशन अंतर्गत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील सुरू असलेल्या ११६४ योजनांच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे. इतर योजनांची कामे गतीने वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

अर्धवट आणि निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदारांचा काळ्या यादीत समावेश करावा. जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामांच्या डेटा एंट्री वेळेत करावी. महिला बचत गटांमार्फत कचरा संकलन आणि वर्गीकरण करण्याच्या उपाययोजना करावी. ग्रामपंचायत




कर्मचारी नियुक्ती करून गावस्तरावर स्वच्छता व्यवस्थापन प्रभावी करण्याच्या सूचना मंत्री श्री. पाटील यांनी दिले.यावेळी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि शौचालयांच्या सुविधा यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.आढावा बैठकीस जलजीवन मिशनचे संचालक ई. रवींद्रन, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पाणीपुरवठा विभागाचे सहसचिव बी. जी. पवार, मुख्य अभियंता प्रशांत भांबरे, स्वच्छ भारत मिशनचे अतिरिक्त अभियान संचालक शेखर रौंदळ यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# छगन भुजबळांचे मुख्यमंत्र्यांना पत्र:पुणे नाशिक सेमी हाय स्पीड रेल्वे सिन्नर-चाकण मार्गेच करण्याची केली मागणी

**नाशिक (वृत्तसंस्था)**–इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर (खचएएउ) अंतर्गत पुणे नाशिक सेमी हाय स्पीड थेट रेल्वे मार्गाचा समावेश करून राज्य शासनाने प्रकल्पाचा ५०% वाटा रेल्वे मंत्रालयाला मंजूर करण्यापूर्वी अंतिम आखणी (-श्रळसपाशपीं) सिन्नर संगमनेर नारायणगाव मंचर राजगुरुनगर चाकण मार्गेच होण्यास पूर्ववर्त करण्यात यावे अशी मागणी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, राज्यातील ग्रामीण भागात विशेषतः अविकसित भागातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी व लवकरात लवकर हे प्रकल्प पूर्ण व्हावे. हा दृष्टिकोन समोर ठेवून राज्य शासनाने ५०% आर्थिक सहभाग देण्याचे धोरण स्वीकारले आहे. पुणे-नाशिक या २३६ कि. लांबीच्या नवीन सेमी हाय स्पीड रेल्वे मार्गाचे बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी (महारेल) ची नियुक्ती करून आर्थिक सहभाग देण्यास शासन निर्णय क्र. आरएलवाय - ०२१२/१८०/प्र. क्र. ३७/ परिवहन-५ दि. १५.०४.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली होती. सदर प्रकल्प र १६०३९ कोटी (आत्ता २५००० कोटी) एवढ्या एकूण प्रकल्प खर्च रकमेच्या मर्यादेत ६०% कर्ज आणि ४०% समाभागमुल्य या प्रमाणात राबवण्यास मान्यता देण्यात आली.मात्र, डीपीआरमधील प्रस्तावित संरेखन नारायणगावमधून जात होते जिथे राष्ट्रीय रेडिओ खगोल भौतिकशास्त्र केंद्र (एनसीआरए), पुणे यांनी जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप (जीएमआरटी) वेधशाळा स्थापित केली आहे. जीएमआरटी वेधशाळेच्या कार्यक्षेत्रातून प्रस्तावित रेल्वे मार्गाचा जात



असल्याने मा. रेल्वे मंत्री यांनी दि. १८.१२.२०२४ रोजी सदर पुणे नाशिक रेल्वे मार्गाचे संरेखन बदलून पुणे-अहिल्यानगर-साईनगर शिर्डी-नाशिक असा ८० कि. वळसा घालून करण्यात आला. तसेच सदर रेल्वे प्रकल्प महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी (महारेल) ऐवजी मध्य रेल्वे मार्फत करण्याचे रेल्वे मंत्री यांनी जाहीर केले. सदर संरेखन कुठल्याही परिस्थितीत पुणे नाशिक थेट रेल्वे मार्गास अनुसरून नाही ज्याचा सर्वाधिक फटका पुणे नाशिक औद्योगिक पट्ट्यातील मालवाहतुकीसोबत प्रवासी वाहतुकीला देखील बसणार असल्याचे म्हटले आहे.केंद्र सरकारने इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर (खचएएउ) अंतर्गत नाशिक वाढवण पोर्ट रेल्वे मार्गाचा फायनल लोकेशन सर्व्हे (ऋङड) नुकताच मंजूर केला आहे. पुणे नाशिक थेट रेल्वे मार्ग पश्चिम महाराष्ट्रातील कंटेनर मालवाहतूक मुंबई उपनगरीय रेल्वे सेवेला बायपास करून थेट नाशिक मार्गे वाढवण बंदराला जोडेल ज्यामुळे राज्याला शाश्वत पर्याय उपलब्ध असेल. पुणे नाशिक सेमी हाय स्पीड थेट रेल्वे प्रकल्पासाठी महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास कंपनी (महारेल) ची नियुक्ती केल्यास रेल्वे नियमांचे पालन करीत प्रकल्पाचे नियोजन आणि अमंलबजावणी करण्याची संपूर्ण जवाबदारी राज्य शासन महारेल कडे सोपवू शकते ज्याचा सर्वाधिक फायदा पुणे नाशिक औद्योगिक पट्टयाला मॅग्नेटिक महाराष्ट्र अंतर्गत निर्यातक्षम कंटेनर मालवाहतूक रेल्वेने वाढवण बंदराला पाठवण्यासाठी राज्याला शाश्वत पर्याय उपलब्ध करेल. त्यामुळे इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर (खचएएउ) अंतर्गत पुणे नाशिक सेमी हाय स्पीड थेट रेल्वे मार्गाचा समावेश करून राज्य शासनाने ५०% वाटा रेल्वे मंत्रालयाला मंजूर करण्यापूर्वी अंतिम आखणी (-श्रळसपाशपीं) सिन्नर संगमनेर नारायणगाव मंचर राजगुरुनगर चाकण मार्गेच होण्यास पूर्व शर्त करण्यात यावी, अशी मागणी छगन भुजबळ यांनी केली आहे.

# म्हैसमाळच्या गिरजा देवी यात्रेस आजपासून प्रारंभ

## फुलंब्री तालुक्यातील भाविक २०० बैलगाड्यातून दाखल

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

मराठवाड्याचे कुलदैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या म्हैसमाळ येथील गिरजादेवीच्या यात्रेस आजपासून प्रारंभ होत आहे. जिल्हाभरातील भाविक यात्रेसाठी म्हैसमाळ येथे दाखल होत असून आज फुलंब्री तालुक्यातील भाविक २०० गाडीवालांमधून दाखल झाले. यात्रेनिमित्त मातेच्या मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. म्हैसमाळ येथील गिरजा मातेची यात्रा उत्सव माघ पौर्णिमेपासून सुरुवात होतो. आजपासून या यात्रेस प्रारंभ होत असून यानिमित्ताने सकाळी
संस्थांनचे अध्यक्ष तथा तहसीलदार स्वरूप कंकाळ यांच्या हस्ते मातेस पारंपारिक अलंकार चढवून तसेच महाअभिषेक व महाआरती करून यात्रा उत्सवास प्रारंभ होईल. यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी जिल्हाभरातील भाविक म्हैसमाळ म ध्ये येत असून आज फुलंब्री तालुक्यातील भाविक जवळपास २०० बैलगाड्यांमधून यात्रे करता दाखल झाले. यात्रा परिसरामध्ये व्यवसायिकांनी आपली विविध दुकाने थाटले असून यामध्ये उपहारगृहे, पूजेचे साहित्य, प्रसाद, खेळण्याची दुकाने संसार उपयोगी वस्तूंची दुकाने यांचा समावेश आहे. यात्रा
उत्सव पुढील पाच दिवस चालणार असून या काळामध्ये जवळपास पाच लाख भाविक यात्रेत सहभागी होऊन म तेचे दर्शन घेतील असा अंदाज आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विविध सुविधा पुरविण्यासाठी पुजारी मनोहर भारती, नंदु भारती, राजू भारती, मंडळ अधिकारी विजय चव्हाण ग्राम महसूल अधिकारी बंडू आव्हाड व्यवस्थापक ज्ञानेश्वर जाधव यांच्यासह ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून मंदिर परिसरावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी नजर ठेवण्यात येत आहे.





# व्हॉईस ऑफ मीडिया च्या राज्य संघटक पदी सुकेशनी नाईकवाडे(रॉय) यांची निवड

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया च्या राज्य कार्यकारणी वर राज्य संघटक म्हणून बीड येथील पत्रकार सुकेशनी नाईकवाडे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.



व्हॉईस ऑफ मीडिया राज्याची फादर बॉडी मध्ये सुकेशनी नाईकवाडे (रॉय) यांची निवड होण्या अगोदर यांनी राज्यावर प्रदेश अध्यक्ष (महिला विभाग ) पदावर राहून महिलांची राज्य कार्यकारणी स्थापन करत राज्यात महिलांना व्हॉईस ऑफ मीडिया शी जोडण्याचे काम चांगल्या पद्धतिने केले असून त्यांना व्हॉईस ऑफ मीडिया चे संस्थापक अध्यक्ष श्री.संदीप काळे यांनी सुकेशनी नाईकवाडे (रॉय) यांच्या कार्याची दखल घेत त्यांना नुकत्याच पार पडलेल्या राज्य कार्यकारणी मध्ये त्यांना राज्य संघटक पदावर त्याची निवड करत त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली असून त्यांचे राज्य संघटक पदी निवड झाल्या बाबद अभिनंदन केले आहे यावेळी प्रदेशाध्यक्ष श्री अनिल मस्के प्रदेश कार्याध्यक्ष श्री योगेंद्र दोरकर, सरचिटणीस डॉ. दिगंबर महाले, मंगेश खाटीक, विजय चोरडिया यांनी नव्या नियुक्ती बद्दल अभिनंदन केले आहे.

# चाटे स्कूल मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात;विद्यार्थी कलाकारांच्या सादरीरणावर प्रेक्षकांनी धरला ठेका

**केज । प्रतिनिधी**

शहरातील समर्थनगर भागातील चाटे स्कुल मध्ये मंगळवार रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमास जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, डॉ नितीन चाटे,शिवाजी ठोंबरे,दिनकर चाटे,भगवान चाटे,रामधन चाटे ,अजय चाटे , राजेभाऊ चाटे , अंनिस चे हनुमंत भोसले, दुर्गादास लांब, डॉ हनुमंत सौदागर, श्रीराम तांदळे,अनिल गलांडे,अर्शद शेख,मुबशीर शेख, दिनकर चाटे, संस्थेचे सचिव शिवाजी चाटे आदींची उपस्थिती होती .चाटे इंग्लिश स्कूल येथील चौथ्या स्नेहसंमेलन कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी,विविध गीतांवर ठेका धरत



प्रेक्षकांची मने जिंकली. सोशल मीडिया च्या अतिवापराचे दुष्परिणाम, अंधश्रद्धा निर्मूलन , पर्यावरण , देशभक्ती आदी विषयावर नाट्य,गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रास्तविक शिवाजी चाटे यांनी केले हनुमंत भोसले सर यांनी विद्यार्थ्यांना कला, क्रीडा, संगीत या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे मत व्यक्त केले. व विद्यार्थ्यांची आवड कशात आहे हे पालकांनी व शिक्षकांनी ओळखून विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करून प्रोत्साहन द्यावे मला खात्री आहे की चाटे स्कुल च्या रोपातून वटवृक्ष उभा राहत आहे.विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमी करून मैदानी खेळ खेळावेत असे मत व्यक्त केले. स्नेहसंमेलन कार्यक्रमास पालक ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# संजय गांधी, श्रावणबाळ योजनेतील निराधारांचे अनुदान तात्काळ वितरीत करा

## आ.संदीप क्षीरसागरांचे तहसिलदारांना निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी या व अशा प्रकारच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान तात्काळ वितरीत करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तहसिलदार यांना दिले आहेत.

बीड विधानसभा मतदारसंघातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यातील लाभार्थ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान मिळालेले नाही. या योजनेचे लाभार्थी म्हणजे गरजू, निराधार आणि दुर्बल असतात. त्यांचे जीवनमान या अनुदानावर अवलंबून असते. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांचे लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सदरील योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांना मिळणाऱ्या अनुदानाची रक्कम तात्काळ वितरीत करा असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासारचे तहसिलदार यांना दिले आहेत.



# वडमारे नावाच्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्याला झालेल्या मारहाणीचा जाहीर निषेध-नवनाथ शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील पेठ बीड भागामध्ये नगर परिषदेचे एका दीनदुबळ्या कर्मचाऱ्यान झालेल्या मारहाणीचा जाहीर निषेध करत असल्याचे एका प्रसिद्धी पत्रकामध्ये बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे सध्या बीड शहरांमध्ये सर्वत्र नगर प्रशासनाच्या वतीने अतिक्रमण हटाव व स्वच्छता मोहीम चालू आहे याच पार्श्वभूमीवर बीड शहरातील पेठ बीड भागामध्ये नगर परिषदेचे काही कर्मचारी चार ते पाच साफसफाई करण्यासाठी गेले असता त्या ठिकाणच्या गाव गुंडांनी त्यांना मारहाण केली या या मार हाणीचा नवनाथ



अण्णा शिराळे पाटील यांनी जाहीर निषेध नोंदवला आहे या गाव गुंडांनी या दीन दुबळ्या गरीब वडमारे नावाच्या कर्मचाऱ्याला मारहाण करून नेमका कुठला पुरुषार्थ साध्य केला आहे त्यांना जर नगरपालिकेच्या विषयी कुठला जर राग असेल तर त्यांनी नगर परिषदेच्या समोर आंदोलन करावे मोर्चा काढावे लोकशाही मार्गाने त्यांनी लढावे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटावे नगर प्रशासनाच्या विरोधात त्यांनी मोठे आंदोलन उभा करावे परंतु असे गोर गरीब दिन दुबळ्या कर्मचाऱ्याला मारहाण करून नेमका कुठला पुरुषार्थ त्यांना साध्य करायचा आहे हेच कळेनासे झाले आहे म्हणून या मार हनीचा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी जाहीर निषेध नोंदवला आहे.

# पालक सचिव पराग जैन यांनी घेतला जिल्ह्यातील विविध विकास कामांचा आढावा

## पालक सचिव यांनी घेतला विकास कामाचा आढावा

**जालना । असलम कुरेशी**

माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव तथा जालना जिल्ह्याचे पालक सचिव पराग जैन यांनी आज जालना येथे भेट देवून, जिल्ह्यातील विविध विकास कामांचा सविस्तर आढावा घेतला. विविध विभागांच्या माध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वांनी नियोजन करुन विकास कामे करावीत अशा सूचना पालक सचिव पराग जैन यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित आढावा बैठकीत पालक सचिव श्री. जैन हे बोलत होते. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी एस. आर. पठारे, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, मनपा आयुक्त संतोष खांडेकर जिल्हा नियोजन अधिकारी श्री. सुर्यवंशी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. कापसे यांच्यासह विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित बैठकीत श्री. जैन यांनी जिल्ह्यात झालेल्या विकास कामांबाबत समाधान व्यक्त केले. तसेच प्रत्येक विभागाचा आढावा घेत संबंधीत विभागाच्या समस्या जाणून घेतल्या. बैठकीच्या सुरुवातीस श्री. जैन यांनी प्रशासनाकडून जिल्ह्यात होणारे जालना ते जळगाव रेल्वे मार्ग, जालना ते नांदेड द्रूतगती महामार्ग, जालना खरपूडी (सिडको), पवित्र, ड्रायपोर्ट, प्रादेशिक मनोरुग्णालय, रेशीम उद्योग व हातमाग प्रशिक्षण केंद्र, मॅजीक इन्क्युबेशन सेंटर, मोसंबी-एक जिल्हा एक उद्योग, महादिप-एक संकल्प आदी प्रकल्पाची सविस्तर माहिती घेतली. तसेच महसूल, कृषी, रेशीम, भूसंपादन, क्रीडा, नगररचना, जल जीवन, जिल्हा नियोजन समिती अंतर्गत प्रारुप आराखडा आदींचा त्यांनी संबंधित



विभाग प्रमुखांकडून यावेळी आढावा घेतला.

यावेळी पालक सचिव श्री. जैन म्हणाले की, जिल्हा प्रशासनाने महानगर पालिका क्षेत्रातील नगर भूमापन मिळकतींचे जी.आय.एस. आधारीत सर्व्हेक्षणाकरीता सुरु केलेला 'पवित्र' हा कार्यक्रम अत्यंत चांगला आहे. या जिल्ह्यातील उद्योगांना कोणत्या प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. याचा अभ्यास करुन मॅजीक इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून उमेदवारांना प्रशिक्षण द्यावे. तसेच मोसंबी-एक जिल्हा एक उद्योग करीता डिजिटल कॉमर्ससाठी ओपन नेटवर्कचा उपयोग करावा. तसेच याचे शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. कोणतीही योजना राबवितांना त्या माध्यमातून होणारा फायदा किंवा लाभावर लक्ष केंद्रीत करुन निधी खर्च केल्यास त्या योजनेचा सामान्य जनतेला नक्कीच फायदा होण्यास मदत होते. त्यानुसार प्रत्येक योजनेचे नियोजन करुन ती राबविण्यात यावी. सर्व शासकीय विभागांचे मंत्रालय स्तरावर असलेल्या प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली. तसेच शासनस्तरावर १०० दिवस कृती आराखड्याचा नियमित आढावा घेण्यात येणार आहे. त्याकरीता शासकीय कार्यालयांचे संकेतस्थळ अद्ययावत करणे, 'ईज ऑफ लिव्हिंग' संकल्पनेवर काम करणे, शासकीय कार्यालयात स्वच्छता मोहीम राबविणे, नागरिकांच्या तक्रारी, प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढणे,क्षेत्रीय दौरे याचे नियोजन करुन तसेच उद्दिष्ट ठेवून काम करावे अशा सूचना ही श्री. जैन यांनी यावेळी दिल्या.यावेळी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी जिल्ह्यातील विविध योजनांच्या प्रगतीचे तसेच होणाऱ्या प्रकल्पाचे सादरीकरण केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077